कार्यालय पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, जालना
टोल फ्री क्रमांक - 1064
कार्यालय दुरध्वनी क्र :- 02482-220252

## :: प्रेस नोट ::

दिनांक :- 13.10.2020.

**नगर परीषद कार्यालय जालना येथील कार्यालय अधिक्षक श्री. सुधाकर हरीभाऊ डांगे यास 1,000/- रुपयांची लाच घेतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना च्या पथकाने पकडले.**

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | आरोपीचे नाव, हुद्दा व पत्ता | :- | लोकसेवक श्री. सुधाकर हरीभाऊ डांगे वय 53 वर्ष व्यवसाय कार्यालय अधिक्षक, नगर परीषद जालना रा. एस एस पार्क सावंगी हर्सुल औरंगाबाद. |
| 2 | गुन्हा घडला ता/ठि | :- | दि- 13.10.2020 रोजी आस्थापना विभाग, नगर परीषद कार्यालय जालना येथे |
| 3 | लाचेची रक्कम | :- | 1,000/- रुपये. |

याबाबत हकीगत अशी की, यातील तक्रारदार यांनी तक्रार दिली की, त्यांचे नगर परीषद जालना येथे 3 ते 4 गुत्तेदारी कामाचे एफडीआर प्रोसेसिंगचे फाईल प्रलंबित असुन त्या सर्व फाईल मंजुरीसाठी नगर परीषद कार्यालय अधिक्षक श्री सुधाकर डांगे यांचेकडे असल्याने त्यांनी सर्व फाईल मंजुरीचे प्रत्येकी 1000/- रुपये दयावे लागतील असे सांगुन लाचेची मागणी केली. सदर कामासाठी तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालना येथे संपर्क साधून तक्रार दिली. सदर तक्रारीवरुन पडताळणी केली असता आलोसे श्री सुधाकर डांगे यांनी तक्रारदार यांचेकडे प्रत्येक फाईलचे 1,000/- रुपयेची लाचेची मागणी करुन गरीबशहा बाजार जालना येथील कब्रस्थानमध्ये हायमास्ट लाईटचे फाईलचे 1000/- स्विकारणार असल्याचे निष्पण्ण झालेवरुन आज दि. 13.10.2020 रोजी आलोसे श्री. सुधाकर हरीभाऊ डांगे, कार्यालय अधिक्षक यांनी तक्रारदार यांची कब्रस्थानमध्ये हायमास्ट लाईटचे एफडीआर प्रोसेसिंग फाईल मंजुरीस पाठविण्यासाठी त्यांचेकडुन 1,000/- रुपये लाचेची रक्कम स्वत: पंचासमक्ष स्वीकारली असतांना, त्यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालनाचे पथकाने आस्थापना विभाग, नगर परीषद कार्यालय, जालना येथे रंगेहाथ पकडण्यात आले.

लोकसेवक श्री. सुधाकर हरीभाऊ डांगे वय 53 वर्ष व्यवसाय कार्यालय अधिक्षक, नगर परीषद जालना रा. एस एस पार्क सावंगी हर्सुल औरंगाबाद यांचे विरुध्द गुन्हा दाखल करण्याबाबत पुढील कार्यवाही चालु आहे.

**तसेच ॲन्टी करप्शन ब्युरो कडुन आवाहन करण्यात येते की, कोणी लोकसेवक शासकीय कामासाठी लाचेची मागणी करीत असल्यास किंवा खाजगी व्यक्ती मार्फत कोणी लाचेची मागणी करीत असल्यास 02482-220252, तसेच टोल फ्री क्रमांक 1064 वर संपर्क करावा. तसेच पोलीस उप अधिक्षक जालना मो.नं. 8975762906, पोलीस निरीक्षक मो.नं. 8390757835, 9823216788 वर संपर्क करावा.**

पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक
विभाग,जालना.